विशेष दिवाणी दावा क्र. ९ / २०१६

सुनाबाई मोरे वगैरे

वि.

जिल्हाधिकारी, सोलापूर वगैरे

## आदेश निशाणी क्र. ९३ आणि ९५ वर एकत्रीत आदेश

1. प्रतिवादी क्र. ४ प्रदिपकुमार रामचंद्र बिराजदार आणि प्रतिवादी क्र.५ विद्यादेवी प्रदिपकुमार बिराजदार यांचे विरुध्द दावा एकतर्फा चालवण्याचा आदेश दि. १०/०६/२०१६ रोजी करण्यात आलेला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. ५ यांचे कैफियत शिवाय दावा पुढे चालवण्याचा आदेश दि. १६/०२/२०१८ रोजी करण्यात आलेला आहे. परंतु प्रतिवादी क्र. ४ व ५ हे त्यांचे वकील यांचे मार्फत दि. ११/०३/२०१६ रोजी हजर झालेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी यांचे विरुध्द दावा एकतर्फा चालवण्यात यावा असा आदेश चुकीने पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. ४ हे मिलट्रीमध्ये सेवानिवृत्त आहेत. प्रतिवादी क्र. ५ या शिक्षण खात्यामध्ये नोकरीस आहेत. त्यामुळे वकीलांशी संपर्क साधून त्यांना प्रकरणातील आवश्यक माहिती व कागदपत्रे देता आले नाहीत. सबब त्यांचे कैफियत शिवाय दावा पुढे चालवण्याचा आदेश रदद करुन दिलेली कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

2. त्यावर वादी यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी मंगळवेढा येथील न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. २००/१५ आणि १९९/१५ हे दाखल केलेले आहे. त्यापैकी नियमित दिवाणी दावा क्र. २००/१५ हा दि. २७/०७/२०१८ रोजी नामंजूर करण्यात आलेला आहे. तर नियमित दिवाणी दावा क्र. १९९/१५ हा दावा चौकशीसाठी प्रलंबित आहे. प्रकरणाची माहिती होवूनही प्रतिवादी यांनी कैफियत दिलेली नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे वादी यांनी सांगितले.

3. प्रस्तुत दावा इतर प्रतिवादी यांचे विरुध्द एकतर्फा अथवा कैफियत शिवाय पुढे चालवण्याचा आदेश करण्यात आलेला आहे. या प्रकरणामध्ये वादी यांचे तर्फे एकूण ४ साक्षीदार तपासण्यात आलेले आहेत. परंतु वादी व प्रतिवादी क्र. ४ व

५ यांचे दरम्यान असलेला वाद विषयाचा गुणदोषावर अंतिम व योग्य निर्णय होण्यासाठी त्यांनी दिलेली कैफियत रेकॉर्डवर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. परंतु दरम्यान वादी यांनी एकूण ४ साक्षीदार यांची साक्ष नोंदवली त्यामुळे वादी यांना कॉस्ट देण्यात यावी असा आदेश देणे गरजेचे आहे. त्यामुळे, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आ दे श</u>**

1. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
2. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी वादी यांना रक्कम रु. १०००/- कॉस्ट दिल्यानंतर त्यांचे कैफियतशिवाय दावा पुढे चालवण्याचा झालेला आदेश रदद करण्यात येत आहे.
3. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी पुढील तारीख दि. २७/०९/२०१९ रोजी न चुकता वादी यांना कॉस्ट दयावी अथवा न्यायालयात जमा करावी. त्यानंतरच त्यांनी दिलेली कैफियत रेकॉर्डवर घेण्यात येत आहे. अन्यथा सदर आदेश रदद समजण्यात येईल.

दिनांक : २०/०९/२०१९

( श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार )
२ रे सहदिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| a | Name of the Stenographer | : P. N. Kanaki. |
| b | Court | : 2nd Jt. C.J.S.D.& A.C.J.M, Pandharpur. |
| c | Date of Order | : 20/09/2019 |
| d | Order signed by P.O. on | : 20/09/2019 |
| e | Order uploaded on | : 21/09/2019 |